# ॥ श्री दत्त प्रभू - आरती ॥

श्री दत्ता गुरुदत्ता, आसरा तूची आता
भक्त रक्षणा सिद्ध, असशी दिगंबरा अवधूता ॥ १ ॥

काया दर्शविते तुझी, सारी ब्रह्मांड माया
चिंता साऱ्या मिटती, लागता तव पाया ॥ २ ॥

त्री रूपे जागृत, भक्तांचे त्री ताप हराया
हस्त सहा योजिले, षड रिपू ताडाया ॥ ३ ॥

सहा नेत्र दाविती, सदमार्ग भक्ता या
चरणी ठेवीता माथा, मना धन्यता या ॥ ४ ॥

तव भेटीची ज्योत, तेविते मनात या
दाविसी पथ सत्वर, पदी तव पोचाया ॥ ५ ॥

क्षमा करा अपराध, पदरी मजला घ्या
प्रसंगी शिक्षा द्या, परी असू द्या माया ॥ ६ ॥

उरले संसार आयुष्य, समर्पिले तव पाया
आलो तुझ्या पायी, द्यावी करुणा दया ॥ ७ ॥

श्री गुरु चरणरज,
-सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID:- sachin.kulkarni78